

## सेंट्रल हॉल; देशाच्या इतिहासाचा साक्षीदार
## इंदिरा गांधींच्या तैलचित्राचे अनावरण रहित

*१८ नोव्हेंबर १९८५*

सुखद थंडीच्या गुलाबी शालीत राजधानी लपेटून गेली आहे. ही मस्त हवा आंतरराष्ट्रीय सलगी साधणारी असल्याने जागतिक परिषदांचे पेवच दिल्लीत फुटले आहे. एका बाजूला कामविज्ञानावर जागतिक परिषद तर दुसऱ्या बाजूला धर्म परिषद, असा प्रकार चालू आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशनही आजपासून सुरू होत आहे.

राजकीय प्रांगणात इंदिरा काँग्रेसचीच लखलखती दिवाळी असून विरोधी पक्षांच्या पणत्या कशाबशा मिणमिणत आहेत. त्यामुळे अधिवेशन फारसे वादळी ठरण्याची लक्षणे दिसत नाहीत.

श्रीमती इंदिरा गांधी यांचे तैलचित्र सेण्ट्रल हॉलमध्ये लावण्याचा निर्णय लोकसभेच्या सर्वसाधारण उद्देश समितीने घेतला आहे. या तैलचित्राचे १९ नोव्हेंबरला इंदिरा गांधींच्या जयंतीदिनी उपराष्ट्रपती वेंकटरामन यांच्या हस्ते अनावरण व्हायचे होते. परंतु हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे ऐनवेळी लोकसभा कार्यालयाने जाहीर केले आहे. मायकेल वेल्डीफ या अमेरिकन कलाकाराने काढलेले श्रीमती गांधींचे तैलचित्र पसंत न पडल्याने हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असावा, असा एक तर्क आहे. पण १९ नोव्हेंबरला नाही तरी नंतर हे तैलचित्र सेण्ट्रल हॉलमध्ये निश्चित लावले जाणार आहे. सेंट्रल हॉलमध्ये पंधरा नेत्यांची तैलचित्रे असून श्रीमती इंदिरा गांधींचे सोळावे तैलचित्र असेल.

## कसले कारस्थान?

सेण्ट्रल हॉलमध्ये श्रीमती गांधी फारशा बसत नसत. दर गुरुवारी त्यांचा राज्यसभेत प्रश्नोत्तराचा तास असे व त्यासाठी सेण्ट्रल हॉलमधून त्यांना जावे लागे. जनता राजवटीत चिकमंगळूरहून पोटनिवडणुकीत त्या निवडून आल्या; तेव्हा मात्र एखाद्या सम्राज्ञीसारखा विजयी मुद्रेने त्यांनी याच सेण्ट्रल हॉलमध्ये प्रवेश केला होता व त्यांच्या पक्षाच्या खासदारांनी त्यांचे मोठ्या दिमाखाने हारतुऱ्यांच्या वर्षावाने स्वागत केले होते.

## फिरोज कॉर्नर

श्रीमती गांधींचे तैलचित्र जेथे लावले जाणार आहे, तेथून काही फुटांवरच उजवीकडे मागच्या बाजूला सोफासेट मांडलेले आहेत. हाच तो प्रसिद्ध 'फिरोज कॉर्नर.' फिरोज गांधी यांचा त्या सोफ्यावर नेहमीच मुक्काम असे. सोबत मोरारका, पटेल ही दोस्त मंडळी असत. कॉफीच्या सुगंधाबरोबर गप्पाही दरवळत. फिरोज कॉर्नरला मग अन्य खासदारांचा गराडा पडे व चैतन्याने हा कोपरा उजळून जाई. फिरोज गांधींना पत्रकारांबद्दल विशेष आस्था होती. पत्रकारही या कॉर्नरवर नेमाने हजेरी लावत. संसदेचा वृत्तान्त छापल्यामुळे पत्रकारांवर गंडांतर येऊ नये, म्हणून त्यांना संरक्षण देणारे विधेयक फिरोज गांधींनी आणले होते. त्याचा जन्म याच फिरोज कॉर्नर येथे झाला.

बाबू जगजीवनराम हल्ली खासदार असले, तरी सेण्ट्रल हॉलमध्ये फिरकत नाहीत; पण मंत्री असताना मात्र ते हमखास या सभागृहात चक्कर मारीत. त्यांची तिरकस टिप्पणी वातावरण हशाने खळखळत ठेवी. यशवंतराव चव्हाण क्वचितच सेण्ट्रल हॉलमध्ये येत. एकदा मधू दंडवते यांनी यावरून यशवंतरावांना छेडले होते. बाबूजी नेहमी सेन्ट्रल हॉलमध्ये येतात; तुम्ही का नाही येत, अशी विचारणा त्यांनी केली होती. त्यावेळी ''सध्या वातावरण वेगळे आहे. आपण काहीतरी बोलून जातो आणि त्याचा

काहीतरी विपरीत वृत्तान्त वर पोचवला जातो. त्यामुळे मी सेन्ट्रल हॉल टाळतोच.'' असे उत्तर यशवंतरावांनी दिले होते.

## नेहरू व त्यागी

खरे तर आरंभीच्या काळात पक्षात खेळीमेळीचे वातावरण होते. चहाडखोर, चुगलखोर, खुषमस्करे यांचा सुळसुळाट झालेला नव्हता. सेण्ट्रल हॉलमध्येच एकदा काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक भरली होती. पूर्वोत्तर सीमेवर चीनचे आक्रमण झालेले होते. कृष्णमेनन यांच्याविरुद्ध पक्षात संतापाची लाट उसळली होती. संसदीय पक्षाच्या बैठकीत चांगलीच गरमागरमी झाली. ज्यांना मेनन नको असतील त्यांनीच निघून जावे, असे नेहरू म्हणाले.

त्यावर महावीर त्यागी उभे राहिले व 'आम्ही तुम्हाला नेता म्हणून निवडून दिले आहे. तेव्हा तुम्हाला मेनन यांचे समर्थन करावयाचे असेल, तर तुम्हीच चालते व्हा,' असे ठणकावले. वातावरण एकदम तंग झाले.

त्यागींभोवती खासदारांचा गराडा पडला व 'तुम्ही नेहरूंना असे म्हणायला नको होते,' असे ते त्यागींना सांगू लागले. त्यावर नेहरूंनी 'त्यांना मोकळे सोडा, त्यांच्यावर दबाव आणू नका. आम्ही एकमेकांना चांगले ओळखतो, आमच्यात काहीही गैरसमज होणार नाही.' असे म्हटले व वातावरण निवळले.

त्यागींची निर्भयता व नेहरूंचा खिलाडूपणा याचीच दिलखुलास झलक त्यावेळी दिसून आली.

फिरोज गांधी यांनीही सेण्ट्रल हॉलमध्ये भरलेली काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक एकदा गाजवली होती. मुंदडा प्रकरणातील बरीच माहिती त्यांनी या बैठकीत उघडकीस आणली. त्यामुळे अखेर टी. टी. कृष्णम्माचारींना राजीनामा द्यावा लागला. संसदीय पक्षाच्या बैठकीच्या कामकाजाचा वृत्तान्त पक्षाचे सरचिटणीस वार्ताहरांना देतात; परंतु त्या दिवशीच्या बैठकीचे वृत्त देऊ नका, अशी नेहरूंनी सूचना दिली. त्यामुळे पत्रकारांची पंचाईत झाली. त्यांनी थेट नेहरूंनाच गाठले व 'तुम्ही अधिकृत वृत्तान्त द्या, नाहीतर उद्या वेगवेगळी वृत्ते प्रसिद्ध होतील,' अशी विनंती केली. त्यावर नेहरू खवळले व म्हणाले, ''तुम्हाला त्या बैठकीतील माहिती कोणी दिली, तर मी त्याचे डोके उडवीन. मी त्याच्यामागे गुप्त पोलिसांचा ससेमिरा लावीन व तो बदमाष आहे असे जाहीर करीन.'' नेहरूंच्या या उत्तराने पत्रकार थक्कच झाले. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रांत बैठकीचा तपशीलवार वृत्तान्त प्रसिद्ध झाला. ४५०-५०० खासदारांत झालेली चर्चा गुप्त राहणे अशक्य आहे, याची नेहरूंनाही जाणीव झाली व कोणाचेही डोके उडवले गेले नाही आणि सर्व शिरे सलामत राहिली!

## अदृश्य सेन्सॉरशिप

पण हे वातावरण नंतर बदलत गेले. १९७५ च्या आणीबाणीच्या काळात सेण्ट्रल

हॉलमध्ये जणू अदृश्य सेन्सॉरशिपच लागू झाली. गप्पा रोडावल्या, भयाकारी काळोखाच्या सावल्या सेण्ट्रल हॉलच्या घुमटावरही डोकावू लागल्या. कोणी मोकळ्या मनाने बोलेना, खुल्या दिलाने वागेना. माजी खासदारांना सेण्ट्रल हॉलमध्ये प्रवेश बंद करण्यात आला. हॉल सुन्न होऊन गेला. त्यातल्या चैतन्याला काजळी लागली. जे खासदार विरोधी पक्षांत मिसळत, त्यांच्यावर नजर ठेवली गेली. याचे उदाहरण म्हणजे दिनेश सिंग. त्यांची व पिलू मोदी यांची वैयक्तिक दोस्ती होती. आणीबाणीच्या काळातही सेंट्रल हॉलमध्ये ते पिलू मोदींशी गप्पा मारत बसत. इंदिरा गांधींपर्यंत ही बातमी पोचली आणि दिनेशसिंगना संसदीय काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आले.

सेण्ट्रल हॉल देशाच्या इतिहासातील सोनेरी क्षणांचा साक्षीदार राहिला आहे. १४ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री सत्तान्तर झाले ते याच सेण्ट्रल हॉलमध्ये आणि स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवाचा सोहळाही याच सेण्ट्रल हॉलमध्ये १९७९ साली झाला.

## घटनेला आकार

१९४६ साली या हॉलची सजावट बदलण्यात आली. तेथे बाके टाकून बसण्याची व्यवस्था करण्यात आली. ९ डिसेंबर १९४६ ते २४ जाने. १९५० या काळात तेथे घटना समितीची अधिवेशने झाली. भारतीय घटनेला आकार आला तो या सेण्ट्रल हॉलमध्ये. घटना समिती बरखास्त झाल्यावर सेण्ट्रल हॉल हा अनौपचारिक गप्पा मारण्याचा 'राजकीय क्लब' बनला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी राष्ट्रपतींचे उभय सभागृहांपुढे भाषण होते. त्यासाठी लोकसभा व राज्यसभेच्या सदस्यांची संयुक्त बैठक सेण्ट्रल हॉलमध्ये भरते. एरवी बंद असणारे पाच नंबरचे द्वार उघडले जाते. लाल गालिचा राष्ट्रपतींच्या स्वागतार्थ अंथरला जातो. राष्ट्रपती त्या मार्गाने येतात. छापील भाषण वाचून दाखवतात. हा सर्व प्रसंग गंभीर असतो. व्ही.व्ही. गिरी राष्ट्रपती असताना मात्र गोंधळ उडाला होता.

त्यांचे इंग्रजीतून भाषण सुरू होताच राजनारायण उभे राहिले होते व 'हिंदीतून बोला' असे ते जोरजोराने ओरडू लागले. त्यावर गिरी संतापले व ''तुम्ही गुंड असाल तर मी सवाई गुंड आहे.'' असे म्हणाले. राजनारायणांच्या कृत्याचे सदस्यांना जेवढे आश्चर्य वाटले, त्याहून अधिक आश्चर्य राष्ट्रपतींच्या अशा उद्‌गारांचे वाटले.

## केसवाणींची चलाखी

फार पूर्वी सेण्ट्रल हॉलमध्ये प्रत्येक खासदार एका व्यक्तीला आपल्याबरोबर आणू शकत असे; पण त्यामुळे अनेक कारखानदार सेण्ट्रल हॉलमध्ये घुसू लागले, मंत्र्यांना गाठून आपली कामे करू लागले. पंडित नेहरूंच्या हे लक्षात आले व त्यांनी एका व्यक्तीला आत आणण्याची मुभा बंद करून टाकली. आता विद्यमान खासदार, माजी खासदार, आमदार आणि काही वरिष्ठ पत्रकार यांनाच सेण्ट्रल हॉलमध्ये प्रवेश दिला जातो. माजी खासदार व आमदारांना प्रवेशपत्र घ्यावे लागते. तरीही काही मंडळी

चलाखी करण्याचा प्रयत्न करतातच.

रामराव आदिक यांचे घनिष्ठ स्नेही सुरेश केसवाणी हे उद्योगपती अहेत. ते महाराष्ट्र विधान सभा अथवा विधान परिषदेचे सदस्य नाहीतच; तरीही आपण आमदार आहोत, असे भासवून ते सेण्ट्रल हॉलमध्ये घुसलेले मी अनेकदा पाहिले आहेत.

### पंतप्रधान नि हृदय

पंतप्रधान राजीव गांधी हजरजबाबी आहेत. कधी कधी मार्मिक विनोदाने ते सारे वातावरण प्रसन्न करून टाकतात. याचा ताजा प्रत्यय मंत्रीमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांना नुकताच आला. मंत्रीमंडळाच्या बैठकीत अनौपचारिक चर्चा चालू होती. विमान वाहतुकीचा मुद्दा निघाला; तेव्हा राजीव गांधी नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री जगदीश टायटलर यांना म्हणाले, 'हैदराबादकडे जरा लक्ष द्या. आंध्रचे मुख्यमंत्री हैदराबादहून अधिक विमानसेवा सुरू कराव्यात असे, म्हणत होते...' तेव्हा ऊर्जा मंत्री वसंत साठे यांना वाटले की, नागपूरची एखादी विमानसेवा काढून घेऊन ती हैदराबादला देतील की काय? म्हणून ते म्हणाले, 'नागपूरची एखादी विमानसेवा कमी करू नका. नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती असलेले महत्त्वाचे शहर आहे...'

त्यावर मिस्कील स्मित करीत राजीव गांधी चटकन म्हणाले, "साठेजी, नागपूर हे मध्यवर्तीच काय पण देशाचे हृदय आहे! परंतु अलीकडे हृदयाच्या बाबतीत त्याला 'बायपास' करण्याची वृत्ती वाढते आहे ना!"

हृदयाची बायपास सर्जरी करण्याचे प्रमाण हल्ली वाढते आहे व खुद्द साठे अमेरिकेत जाऊन बायपास सर्जरी करून आलेले. त्यामुळे 'नागपूर' या हृदयाला 'बायपास' करावे लागणार, यातील गर्भित विनोदाने आख्खे मंत्रीमंडळ खळखळून हसले. त्यात साठेही अगदी 'हृदयापासून' सामील झाले! □

– अशोक जैन

('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)